**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ गौरव गुलाबराव बावनकर यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री.व्ही.के.कौटकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

२९. मला नि.क्र.८० वरील विक्रीपत्र दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदर विक्रीपत्राबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये कोणताही मालमत्तेचा क्रमांक नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.७४ वरील विक्रीपत्रामधील लिहून घेणार माझ्या कुटुंबातील नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ७४ वरील विक्रीपत्र वाद मिळकतीबाबत नाही. हे म्हणणे खरे आहे की, लिहून देणार हे माझ्या कुटुंबातील नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.७४ वरील विक्रीपत्र वाद मिळकतीबाबत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यामध्ये चतु:सिमेचा उल्लेख असल्याने ते वाद मिळकतीसंबंधी आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ७४ च्या विक्रीपत्रामध्ये मालमत्ता क्रमांक किंवा सर्वे क्रमांक नमूद नाही.
प्रश्न - नि.क्र. ७४ वरील विक्रीपत्रामध्ये वाद मिळकतीचा, चतु:सिमा व फकीरा बावनकर यांचा उल्लेख नाही.
उत्तर - त्यामध्ये फकीरा मास्तर असे नमूद केले आहे. ते फकीरा बावनकरचे नाव आहे.

३०. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात फकीरा बावनकरचे नाव फकीरा मास्तर होते असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, फकीरा बावनकर मास्तर होते, असा पुरावा मी दाव्यात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.७४ वरील विक्रीपत्राचा दावा मिळकतीशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ७४ मध्ये चतु:सिमेचा उल्लेख आहे त्यामुळे ते दावा मिळकतीशी संबंधी आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ८० वरील विक्रीपत्राचा दावा मिळकतीशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ८० वरील विक्रीपत्रामधील मिळकत ही दावा मिळकत आहे हे दाखवण्याकरिता मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्राम पंचायतीचा जुना मालमत्ता क्रमांक व नवीन मालमत्ता क्रमांक दाव्यात दाखल केला नाही. (साक्षीदाराला दावा दाखवण्यात आला. त्यांनी नि.क्र.८५ वरील सी.टी. सर्वेचा कागद काढून दाखविला.) मी सी.टी. सर्वेची आखीव पत्रीका दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सी.टी. सर्वे क्र. ६३१ राजेंद्र वंजारी यांच्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये सी.टी.सर्वे क्र. ६३१, प्रतिवादी क्र. २ राजेंद्र वंजारी यांच्या मालकी व ताब्यात आहे व सी.टी. सर्वे क्र. ६१५ व पूर्वेची खाली जागा प्रतिवादी क्र. १ मोहम्मद अली यांच्या मालकी व ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ७५ वरील

वाटणी पत्राप्रमाणे फकीराजी व त्यांच्या मुलांमध्ये शेतीवाडी व नांदागौमुख येथील घरे, जागा, गोठा यांची वाटणी झाली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, विवादीत जागा सुटली होती. हे म्हणणे खरे आहे की, विवादीत जागेचा वाटणीपत्रात उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणीपत्रामध्ये काही जागा किंवा विवादीत जागा वाटणी करायची ठेवली असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल परमानंद यांच्या हिस्साला जी जागा आली होती ती त्यांनी प्रतिवादी क्र. २ यांना विकली. हे म्हणणे खरे आहे की, परमानंद यांच्या हिस्साला आलेल्या जागेच्या चतु:सिमेमध्ये दावा मिळकतीचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे विवादीत जागा सुटली होती हे माझे सांगणे खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणीपत्रामध्ये विवादीत जागेचा वेगळा करारनामा करण्याबाबत नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५४ व नि.क्र. ८५ दावा मिळकतीशी संबंधीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कथित दावा मिळकत किती बाय किती क्षेत्रफळाची आहे हे दाव्यात व माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात लिहिलेली नाही. (साक्षीदाराला पुराव्याचे शपथपत्र दाखवण्यात आले. त्यांनी त्यातील परिच्छेद क्र. १ मध्ये क्षेत्रफळ नमूद असल्याचे दाखवले.) हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये परिच्छेद क्र. १ मध्ये दाखवलेली जागा दावा मिळकतीची जागा नाही. मी प्रतिवादीने केलेले अतिक्रमण दाखविण्याकरिता ग्राम पंचायतकडून मोजणी करून घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच सी.टी.सर्वे विभागाकडून अतिक्रमणाची मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अतिक्रमण दाखवण्याकरिता सरकारी कागदोपत्री पुरावा दाव्यात दाखल केला नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, अतिक्रमण दाखवण्याकरिता सरकारी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने किती अतिक्रमण केले त्याचे क्षेत्रफळ दावा व पुराव्याच्या शपथपत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात दाखल नकाशामध्ये लाल लाईन ही माझ्या वडीलांनी मारली आहे.

**३१.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझ्या जागेवर अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी विरुध्द खोटा दावा दाखल करण्याकरिता दाव्यातील नकाशामध्ये लाल रंगाच्या रेषा जाणून बुजून मारल्या आहे. मला नि.क्र.९२ वरील नकाशा दाखविण्यात आला. त्यावर स्लांटेड लाईन हे बांधकाम दर्शवतात की कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सी.टी.सर्वे क्र. ६१५ ला लागून असलेली जागा मोकळी जागा

आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मोकळी जागा सी.टी.सर्वे क्र. ६१५ चा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, सी.टी.सर्वे क्र. ६३१ वर स्लांटेड लाईन आहे म्हणजेच तेथे बांधकाम आहे व मोकळी जागा नाही. साक्षीदाराला आखीव पत्रीकेची दुय्यम प्रत दाखवण्यात आली. साक्षीदाराला उलटतपासादरम्यान सदरची आखीव पत्रीकेची दुय्यम प्रत दाखवण्यात आल्याने त्यास **निशाणी क्र. १०१** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची आखीव पत्रीका ही प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाऊ गुल अहमद व शेर अहमद यांच्या नावानी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात दाखल केलेले फोटोग्राफ्स दावा मिळकती संदर्भात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या वडिलांनी कोणताही पुरावा नसतांना जागा बळकवण्याच्या हेतूने ग्रामपंचायतमध्ये खोटया तक्रारी दाखल केल्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीवर दबाव आणण्याकरिता त्यांच्या विरुध्द खोटे रिपोर्ट दिले. हे म्हणणे खरे नाही की, माझी रिपोर्ट खोटी असल्याने पोलीसांनी प्रतिवादीवर कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तक्रारी खोटया असल्याने ग्राम पंचायतने प्रतिवादी विरुध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझ्या जागेवर अतिक्रमण केले नाही.

**प्रतिवादीतर्फे वकीलांच्या तोंडी विनंती वरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.03.10 17:46:21 +0530

दिनांक – १०.०३.२०२६
सावनेर.

(एस. एम. गाडे)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर,
सावनेर, जि. नागपूर.